**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**<u>विद्यापीठाद्वारे मराठी भाषा गौरव दिन समारंभानिमित्त २७ फेब्रुवारीला विविध कार्यक्रमांचे आयोजन</u>**

अमरावती.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा गौरव दिन' समारंभ दि. २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे आयोजित केला आहे. उद्घाटन कार्यक्रम सायं. ६.०० वाजता संपन्न होणार असून प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध कवी आणि अभ्यासक डॉ. विठ्ठल वाघ यांचे 'महाराष्ट्र दर्शन' या विषयावर व्याख्यान होणार आहे. समारंभाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

दि. २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी स. ११.०० वाजता मराठी भाषेतील विविध ग्रंथांचे प्रदर्शन होणार असून दु. २.३० वाजता शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, शेगांव नाका, पंचवटी, श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन या मार्गाने मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा गौरव व्यक्त करणारी ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर सायं. ७.०० वाजता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू 'महाराष्ट्र दर्शन' विषयावर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण होणार असून विद्यापीठाची युवा महोत्सव चमूंचा महत्वपूर्ण सहभाग राहणार आहे.

तरी मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने होणाऱ्या विविध कार्यक्रमांचा जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांनी व शहरातील नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख व उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक कळंबे यांनी केले आहे.

---

प्रति,
**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दि. २०/०२/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी